महाराष्ट्र पोलीस

**पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,**

पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००

**E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in**

---

**प्रेसनोट** दिनांक : ०५/०७/२०२३

# नाशिक ग्रामीण पोलीसांचे गुटखा विरोधी 'अभियान - २'

---

महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार मानवी आरोग्याच्या दृष्टीने गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू तसेच मानवी आरोग्यास हानीकारक असणा-या खाद्यपदार्थांची विक्री, उत्पादन, साठवणुक, वाहतुक आदी व्यावसायांना प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे.

त्या पार्श्वभूमीवर नाशिक ग्रामीण पोलीसांनी जिल्हा अंतर्गत गुटख्याची अवैधरित्या वाहतूक, विक्री, वितरण व साठवणूक करणा-यांविरूध्द गुटखा विरोधी अभियान सुरू केले होते. सदर अभियानादरम्यान दि. ०६/०६/२०२३ रोजी पासून दि. ३०/०६/२०२३ रोजी पावेतो गुटख्याची वाहतूक, विक्री, वितरण व साठवणूक करणा-यांविरूध्द कलम ३२८, १८८, २७२, २७३ भादवि, सह कलम ३०(२)(अ) अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ प्रमाणे एकूण १०९ गुन्हे दाखल करून रूपये १,३६,०६,७८५/- चा गुटखा हस्तगत करण्यात आला होता. सदर कारवाईदरम्यान एकूण (११५) आरोपींना जेरबंद करण्यात आलेले होते. तसेच महाराष्ट्र राज्यासह देशातील विविध राज्यांमध्ये गुटखा तस्करीचे नेटवर्क चालविणारा मुख्य आरोपी राज भाटिया यास ग्रामीण पोलीसांनी जयपूर येथून, तर नाशिक जिल्हयातील गुटखा तस्करीचे रॅकेट चालविणा-या तुषार जगताप यास अटक करण्यात आली होती.

सदर गुटखा विरोधी अभियानाअंतर्गत जिल्हयातील अवैध गुटखा विक्रेत्यांवर व्यापक स्वरूपात कारवाई करण्यात आली असून नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे आता गुटखा विरोधी अभियान क्रमांक - २ राबविण्यात येणार आहे. सदरचे अभियान दि. ०६/०७/२०२३ रोजी पासून ते दि. ३१/०७/२०२३ पावेतो सूरू राहणार आहे. यादरम्यान जिल्हयातील ४० पोलीस ठाणे, तसेच अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या १२ विशेष पथकांचे मार्फतीने कारवाई करण्यात येणार आहे.

कॅन्सरसारख्या दुर्धर आजारापासून नागरीकांचा बचाव करण्यासाठी ग्रामीण पोलीसांनी गुटखा विरोधी अभियान सुरू केले असून, यासाठी जिल्हयातील सर्व पान टप-या, किरकोळ विक्रेत्यांची दुकाने, यासह गुटख्याची साठवणूक करणा-या सर्व ठिकाणांची व वाहतूक करणा-या वाहनांची तपासणी करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी दिले आहेत.

गुटख्याची अवैधरित्या होणारी वाहतूक व विक्री यासंबंधी नागरिकांना काही माहीती असल्यास त्यांनी नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे हेल्पलाईन क्र. **६२६२ (२५) ६३६३** यावर माहीती द्यावी, माहीती देणा-या इसमाचे नाव गुप्त ठेवले जाईल, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.